तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २ जुलै २०२५

आतील पानावर

पान २– 'डॉन ३' मध्ये दिसणार आता 'लेडी डॉन'
पान ३ – रश्मिकाला आवडतात विजयमधील हे ...
पान ४ – मॅच्युअर असते तर लग्न टिकले असते
पान ५ – 'बॉर्डर २' चित्रपटात सोनम बाजवा
पान ६ – गांगुलीच्या बायोपिकमध्ये राजकुमार राव

# रवीनाची लेक झळकणार नव्या चित्रपटात



आदित्य सरपोतदार दिग्दर्शित २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मुंज्या' या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. या चित्रपटात अभिनेत्री शर्वरी वाघ व अभिनेता अभय वर्मा मुख्य भूमिकेत झळकले होते. अशातच आता अभय वर्मा लवकरच एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तो प्रसिद्ध अभिनेत्री रवीना टंडनच्या लेकीबरोबर झळकणार आहे. रवीना टंडनची लेक राशा थडानी हिने अजय देवगणच्या 'आझाद' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. या चित्रपटातील गाण्यांमधील तिच्या नृत्याने अनेकांचं लक्ष वेधलं होतं. अशातच आता राशा अभय वर्मासह एका नव्या चित्रपटात झळकणार आहे. काही दिवसांपूर्वीच राशाने इन्स्टाग्रामवर अभय वर्माबरोबरचा एक व्हिडीओ शेअर केला होता. यामध्ये ते एकमेकांसह व्हिडीओ कॉलवर बोलताना दिसले. 'मुंज्या' आणि 'आझाद'नंतर हे दोघे आता एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येण्यास सज्ज आहेत. त्यांच्या आगामी चित्रपटाचं नावही ठरलं आहे.

अभय व राशा मुख्य भूमिकेत असलेल्या चित्रपटाचं नाव 'लाईके लाईका' असं आहे. सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आलेल्या या व्हिडीओमध्ये राशा व अभय आम्ही काहीतरी खास करणार आहोत, त्यासाठी आम्ही तर तयार आहोत, पण तुम्ही तयार आहात का? असं विचारलं होतं. तर शेअर करण्यात आलेल्या या व्हिडीओला त्यांनी ती चिडचिडी तर तो एकदम शांत की याच्या अगदी उलट आहे सगळं, असं कॅप्शन देण्यात आलं होतं. पुढे या व्हिडीओमध्ये राशा व अभय यांचा 'लाईके लाईका' हा चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होणार असल्याचं सांगण्यात आलं. या चित्रपटाचं दिग्दर्शन सौरभ गुप्ता करणार आहेत. नवीन चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर त्यांच्या चाहत्यांनी व्हिडीओखाली कमेंट करत या फ्रेश जोडीला पहिल्यांदाच एकत्र मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी उत्सुक असल्याचं म्हटलं आहे.

'लाईके लाईका' या आगामी चित्रपटातून राशा व अभय पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. 'मुंज्या' व 'आझाद' या त्यांच्या मुख्य भूमिका असलेल्या चित्रपटात उत्तम काम करत प्रेक्षकांची मनं जिंकल्यानंतर आता हे दोघे 'लाईके लाईका' या चित्रपटातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहेत. अभय वर्माने 'मुंज्या'मध्ये केलेल्या कामासाठी अनेकांनी त्याचं कौतुक केलं. या चित्रपटातून तो खऱ्या अर्थाने प्रसिद्धीझोतात आला होता, त्यामुळे आता त्याच्या नवीन चित्रपटात तो कोणत्या भूमिकेत दिसणार, तसेच राशा व त्याची ऑनस्क्रीन केमिस्ट्री कशी असेल याची त्यांच्या चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे.



# ‘डॉन ३’ मध्ये दिसणार आता ‘लेडी डॉन’




दिग्दर्शक फरहान अख्तरच्या ‘डॉन ३’ चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. यात अभिनेता रणवीर सिंह मुख्य भूमिकेत पाहायला मिळणार आहे. तर त्याच्यासोबत अभिनेत्री कियारा अडवाणी दिसणार होती. मात्र आता ती या चित्रपटातून बाहेर पडली आहे. गरोदर असल्यामुळे कियाराला या सिनेमातून काढता पाय घ्यावा लागला. त्यामुळे आता तिच्या जागी कोणत्या अभिनेत्रीची वर्णी लागणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. आता कियाराऐवजी क्रिती चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. क्रितीच्या रिॲक्शनचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तिच्या प्रतिक्रियेवरून ती चित्रपटाचा भाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. क्रिती एका कॅफेमधून बाहेर पडत असताना तेव्हा पापाराझींनी तिला पोज द्यायला सांगितले. तेव्हा ते म्हणाले की, ‘क्रिती जी, डॉन ३, लेडी डॉन, थांबा लेडी डॉन इथे आहे.’ हे ऐकताच क्रिती लाजली. त्यानंतर काहीही न बोलता, ती हसत कारमध्ये बसली. तिच्या या प्रतिक्रियेमुळे चाहत्यांना खात्री पटली आहे की ती फरहान अख्तरच्या चित्रपटात दिसणार आहे. माहितीनुसार, फरहान अख्तर आणि एक्सेल एंटरटेनमेंटची क्रिएटिव्ह टीम डॉन ३ मध्ये स्क्रीन प्रेझेन्स असलेली अनुभवी अभिनेत्री घेण्याचा विचार करत होते आणि क्रिती या भूमिकेसाठी परिपूर्ण आहे. तिच्याकडे रोमाची भूमिका साकारण्यासाठी ऑन-स्क्रीन परिपूर्णता आहे आणि ती लवकरच चित्रपटात साइन करु शकते. दरम्यान, क्रिती सनॉनला फरहान अख्तरच्या मुंबईतील एक्सेल एंटरटेनमेंटच्या ऑफिसबाहेर दिसली. त्यावेळी अनेकांनी ‘डॉन ३’ मध्ये मुख्य भूमिकेसाठी क्रितीला निवडले जाऊ शकते, असा अंदाज लावला होता. मात्र या सर्वांची अद्याप पुष्टी झालेली नाही. क्रिती सनॉनच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, ती शेवटची ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झालेल्या ‘दो पत्ती’ या चित्रपटात दिसली होती. या चित्रपटात तिची दुहेरी भूमिका होती. यात काजोलही भूमिका साकारताना दिसली.

# ‘मालिक’च्या आयटम साँगमध्ये दिसणार हुमा

बॉलीवुड अभिनेता राजकुमार राव याच्या नव्या चित्रपटाची चाहते नेहमी आतुरतेने वाट पाहत असतात. लवकरच राजकुमार मालिक चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तो एका गँगस्टरच्या भूमिकेत असल्याने चाहते या चित्रपटाची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहत आहेत. अशातच मालिक चित्रपटाबाबत एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. या चित्रपटात अभिनेत्री हुमा कुरेशी आयटम साँगमध्ये दिसणार आहे. ‘मेहफिल में मल्लिका का स्वागत’ या गाण्यावर तिने ठेका धरणार आहे. यापूर्वीही अभिनेत्रीने काही चित्रपटांसाठी आयटम साँग केले आहे. मात्र, हे आयटम स्वाँग तिच्यासाठी वेगळे असल्याचे तिने एका मुलाखती दरम्यान सांगितले आहे. मिड-डे सोबत गाण्याचा पहिला लूक तिने शेअर केला आहे. मला आयटम नंबर खूप आवडता! मला अशी गाणी असलेले भारतीय चित्रपट खूप आवडतात, असे तिने म्हटले आहे. हे आयटम साँग तिच्या या आधीच्या आयटम नंबरपेक्षा वेगळे असणार आहे. अभिनेत्री हुमा कुरेशीने तिच्या आत्तापर्यंतच्या फिल्मी करिअरमध्ये अनेक भूमिका साकारलेल्या आहेत. ती विविध मुद्यावर नेहमी भाष्य करत आपले मत मांडत असते. मी नेहमीच एक कलाकार म्हणून कोणतीही भूमिका करु शकते. मला एक कलाकार म्हणून माझे काम बॅलन्स करायचे आहे, असे मत तिने व्यक्त केले आहे. मी स्वतःला एका चौकटीत ठेवणार नाही. मी काय करू शकते आणि काय करू शकत नाही हे मला कोणीही सांगू शकत नाही, असे देखील ती म्हणाली आहे.





# धर्मेंद्र यांच्या चित्रपटात झळकणार ‘हा’ अभिनेता

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांनी आजवर अनेक सुपरहिट चित्रपटांत काम केलं आहे. १९७० च्या काळातील ते प्रसिद्ध अभिनेत्यांपैकी एक होते. त्यांचा ‘शोले’ हा चित्रपट आजही अनेक जण तितक्याच आवडीने बघतात. यातील त्यांची अमिताभ यांच्या बरोबरीची जोडी त्याकाळी चांगलीच गाजली होती. अशातच आता धर्मेंद्र लवकरच एका नवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या चित्रपटात त्यांच्यासह अरबाज खान झळकणार आहे. हे दोघेही तब्बल २७ वर्षांनंतर यामधून एकत्र काम करत आहेत. पूर्वी दोघांनी ‘प्यार किया तो डरना क्या’ या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. अभिनेते धर्मेंद्र अरबाज खानसह एका नव्या चित्रपटातून झळकणार आहेत. रॉनी रॉड्रिग्ज यांनी ‘मैंने प्यार किया फिर से’ या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रॉनी रॉड्रिग्ज यांनी स्वत: या चित्रपटाची कथा व गाण्यांचे गीत लिहिले आहेत. नुकताच या आठवड्यात या चित्रपटाचा मुहूर्त पार पडला. यावेळी अभिनेते राजपाल यादव, गणेश आचार्य, कंगना शर्मा, सुधाकर शर्मा, उदित नारायण, योगेश लखाणी यांसारखी मंडळी उपस्थित होती. माध्यमांच्या वृत्तानुसार प्रसिद्ध गायक उदित नारायण यांनी चित्रपटाच्या मुहूर्तादरम्यान यातील प्रदर्शित न झालेलं एक गाणं गायलं होतं. धर्मेंद्र व अरबाज यांनी त्यांच्या ‘मैंने प्यार किया फिर से’ या आगामी चित्रपटाबद्दल सांगितलं आहे.’ वृत्तानुसार ‘मैंने प्यार किया फिर से’ या चित्रपटाचं कौतुक करताना धर्मेंद्र म्हणाले, हा खूप उत्कृष्ट चित्रपट आहे, यामधून प्रेक्षकांचं खूप मनोरंजन होणार आहे. रॉनी रॉड्रिग्ज आणि या चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह माझ्या शुभेच्छा आहेत. पुढे अरबाजबद्दल धर्मेंद्र म्हणाले, मला ‘प्यार किया तो डरना क्या’ या चित्रपटात त्याच्याबरोबर काम करताना खूप मज्जा आली होती, त्यामुळे मी या आगामी चित्रपटात त्याच्यासह काम करण्यासाठी उत्सुक आहे. यासह अरबाज खानने्ही धर्मेंद्र यांच्याबद्दल सांगितलं आहे. अरबाज म्हणाला, धर्मेंद्र यांच्यासह काम करण्याची पुन्हा एकदा संधी मिळत आहे यासाठी मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. मी रॉनी रॉड्रिग्ज व आमच्या संपूर्ण टीमला यानिमित्त खूप शुभेच्छा देऊ इच्छितो. दरम्यान, अरबाज खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे.

# काव्या मारनसोबतच्या अफेअरच्या चर्चांवर या संगीतकाराने सोडलं मौन



आयपीएल टीम सनरायजर्स हैदराबाद संघाची मालकीण काव्या मारन आणि संगीत दिग्दर्शक अनिरुद्ध रविचंदर यांच्या अफेअरच्या चर्चा सुरु आहेत. दोघं अनेकदा एकत्र दिसले आहेत. तर गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या लग्नाच्याही चर्चा सुरु झाल्या आहेत. रविचंदर हा थलायवा रजनीकांत यांचा भाचा आहे. स्वतः रजनीकांत लग्नाची बोलणी करतील अशाही चर्चा पसरल्या. पण आता या चर्चांवर अनिरुद्ध रविचंदरने मौन सोडलं आहे. संगीतकार अनिरुद्ध रविचंदरने नुकतंच ट्वीट करत या चर्चांवरल भाष्य केलं आहे. त्याने लिहिले, लग्न आह? हाहा..शांत व्हा मित्रांनो... कृपया या अफवा पसरवणं थांबवा. रिपोर्टनुसार, अनिरुद्ध आणि काव्या २०२४ मध्ये रिलेशनशिपमध्ये आले. नुकतेच ते लास वेगासमध्येही एकत्र होते. लास वेगासमध्ये एकत्र फिरतानाच्या त्यांच्या बातम्या व्हायरल झाल्या होत्या. मात्र आता रविचंदरच्या या ट्वीटनंतर त्यांच्या लग्नाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. अनिरुद्ध रविचंदर हा गायक आणि संगीतकार आहे. काही वर्षांपूर्वी आलेलं व्हायरल झालेलं 'व्हाय दिस कोलावरी डी' गाणं त्यानेच गायलं होतं. अनिरुद्ध देशातला सर्वात महागड्या गायकांपैकी एक आहे. प्रत्येक अल्बमसाठी तो कोट्यवधी रुपये घेतो. तर काव्या मारन सन ग्रुपचे अध्यक्ष कलानिधी मारन यांची मुलगी आहे. काव्याने अमेरिकेत शिक्षण घेतलं आणि नंतर ती वडिलांच्या बिझनेसमध्ये आली. सध्या ती सन टीव्ही नेटवर्क लिमिटेडच्या कार्यकारी संचालक पदावर आहे.



# रश्मिकाला आवडतात विजयमधील हे गुण



अभिनेत्री रश्मिका मंदाना हिंदी आणि साऊथ सिनेइंडस्ट्रीत सध्या आघाडीवर आहे. गेल्या काही वर्षात ती अनेक ब्लॉकबस्टर सिनेमांचा भाग राहिली आहे. 'पुष्पा' सिनेमामुळे तिचं नशीबच पालटलं. नंतर ती 'ॲनिमल', 'छावा', 'सिकंदर' या सिनेमांमध्ये झळकली. तर सध्या ती आगामी 'कुबेरा' या साऊथ सिनेमामुळे चर्चेत आहे. यामध्ये तिने धनुष आणि नागार्जुनसोबत स्क्रीन शेअर केली आहे. सिनेमाच्या इव्हेंटवेळी रश्मिकाला काही साऊथ अभिनेत्यांची नावं घेत त्यांचे गुण घ्यायला आवडतील असं विचारण्यात आलं. यावेळी तिचा कथित बॉयफ्रेंड विजय देवरकोंडाचंही नाव घेण्यात आलं. तेव्हा ती काय म्हणाली जाणून घ्या...

रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत आहेत. कधी कॉफी डेट तर कधी डिनर डेटचे त्यांचे फोटो व्हायरल झाले आहेत. मात्र दोघांनी आजपर्यंत त्यांचं नातं जाहीर केलं नाही. नुकतंच 'कुबेरा' सिनेमाच्या प्रमोशनल इव्हेंटवेळी रश्मिकाला प्रश्न विचारण्यात आला. 'अभिनेत्यांमधल्या कोणत्या चांगल्या गोष्टी कॉपी करायला आवडतील?' यावेळी धनुष, अल्लू अर्जुन, नागार्जुन यांची नावं होती. नंतर विजय देवरकोंडाचंही नाव घेण्यात आलं. त्यावर रश्मिकाच्या उत्तराने सर्वांचंच लक्ष वेधलं. विजयचं नाव ऐकताच रश्मिका म्हणाली, सगळं, सगळं घेईन. रश्मिकाच्या या उत्तरानंतर सर्वांनी एकच आवाज केला. रश्मिकाला विजयमधलं सगळंच आवडतं. यासोबत तिने अप्रत्यक्षरित्या विजयवरचं प्रेमच कन्फर्म केलं आहे. रश्मिका, धनुष आणि नागार्जुनचा 'कुबेरा' नुकताच प्रदर्शित झाला आहे. विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना यांनी 'गीता गोविंदम' आणि 'डिअर कॉम्रेड' या सिनेमांमध्ये काम केलं आहे. 'गीता गोविंदम'मध्ये एका गाण्यात रश्मिकाने विजयची नक्कल केली होतीय तेव्हापासूनच ती नॅशनल क्रश बनली. विजय आणि रश्मिकाच्या लव्हस्टोरीलाही तिथूनच सुरुवात झाली.

# दिपा परबची बॉलीवूडमध्ये एन्ट्री

अशा अनेक मराठमोळ्या अभिनेत्री आहेत, ज्यांनी मराठी इंडस्ट्रीत आपल्या कामाचा ठसा उमटला आहे. याशिवाय हिंदी टेलिव्हिजनवरील मालिकांमध्ये आपली अभिनयाची छाप सोडली. तसेच हिंदी चित्रपटातही आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात आपलं अढळस्थान निर्माण केले आहे.

अभिनेत्री दीपा परब ही त्यापैकीच एक. तिने आपल्या सहजसुंदर अभिनयाच्या बळावर रसिकांचे लक्ष वेधले. आता दीपा



परबला एक मोठी संधी मिळाली असून ती एका हिंदी चित्रपटात लीड रोलमध्ये झळकणार आहे. फकिरीयत या आगामी हिंदी चित्रपटात अभिनेत्री दीपा परब मुख्य भूमिकेत असणार आहे. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून संतोष मांजेकर यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. हा त्यांचा पहिलाच हिंदी चित्रपट असणार आहे.

भद्रबाहू डिव्हाइन क्रिएशन्स एलएलपीच्या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. एका प्रदीर्घ ब्रेकनंतर अभिनेत्री दीपा परब पुन्हा एकदा हिंदी चित्रपटात कम बॅक करणार आहे. फकिरीयत हा चित्रपट महावतार बाबाजी व त्यांचा क्रियायोग यांची खरी ओळख सांगणारा आहे. 'चिरुट जलती है' आणि 'अध्यात्म एक विद्रोह, एक क्रांती' या अनुजा जानवलेकर लिखित पुस्तकांवर आधारित या चित्रपटाची कथा आहे. या चित्रपटात दीपा परब, विनीत शर्मा, संतोष जुवेकर, उदय टिकेकर, अक्षय वर्तक, नयन जाधव, संदेश जाधव, अनिशा सबनीस आदी कलाकारांच्या महत्वाच्या भूमिका असणार आहेत.

अभिनेत्री दीपा परब ही शेवटची तू चाल पुढे या झी मराठी वाहिनीवरील मालिकेत दिसली होती. याशिवाय बाईपण भारी देवा या चित्रपटात तिने काम केले आहे. रावणची भूमिका वेगवेगळ्या प्रकारे साकारता येऊ शकते.'

नितेश तिवारी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट रामायणचे शूटिंग गेल्या वर्षीच सुरू झाले आहे. रणबीर आणि साई पल्लवी यांनी त्यांचे शूटिंग आधीच पूर्ण केले आहे. सध्या यश रावणच्या भूमिकेतील शूटिंग करत आहे. चित्रपटात सनी देओल देखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.



# मॅच्युअर असते तर लग्न टिकले असते

रेशम आणि संजीव सेठ यांना दोन मुलं होतं. पण, घटस्फोटानंतर रेशम टिपनीसला पश्चाताप झाला होता. एका मुलाखतीत तिने हे बोलून दाखवलं होतं. रेशम टिपनीस ही मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. रेशम तिच्या पर्सनल आयुष्यामुळे चर्चेत असते. तिचं लग्न 'ये रिश्ता क्या कहलाता है' फेम संजीव सेठशी झालं होतं. मात्र लग्नानंतर काही वर्षांतच घटस्फोट झाला आणि त्यांचा संसार मोडला. रेशम आणि संजीव सेठ यांना दोन मुलं होतं. पण, घटस्फोटानंतर रेशम टिपनीसला पश्चाताप झाला होता.

एका मुलाखतीत तिने हे बोलून दाखवलं होतं. लग्न झालं तेव्हा मी २० वर्षांची होते. लगेच गरोदर राहिले, आई झाले. घराची, मुलांची जबाबदारी सांभाळण्यासाठी मी इतकी सक्षम नव्हते. माझ्यात तितकी समजही नव्हती. माझ्या आणि संजीवच्या वयात १२ वर्षांचं अंतर होतं. जर आम्ही दोघे तितके मॅच्युअर असतो तर आमचा घटस्फोट झालाच नसता, असं रेशम म्हणाली होती. १९९३ मध्ये रेशम टिपनीस आणि संजीव सेठ यांनी लग्नगाठ बांधली होती. पण, २००४ मध्ये घटस्फोट घेत ते वेगळे झाले. संजीव सेठ यांनी त्यानंतर अभिनेत्री लता सबरवाल हिच्याशी लग्न केलं होतं. पण, १४ वर्षांच्या सुखी संसारानंतर त्यांनी देखील घटस्फोट घेतला आहे. तर रेशम टिपनीस बॉयफ्रेंड संदेश कीर्तिकरसोबत सध्या लिव्ह इनमध्ये राहत आहे.

# तेजश्री प्रधान आणि सुबोध भावे दिसणार एकत्र

अभिनेत्री तेजश्री प्रधान आणि अभिनेता सुबोध भावे ही जोडी नव्या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. तेजश्रीने 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेतून एक्झिट घेतल्यानंतर चाहते तिच्या आगामी प्रोजेक्टची वाट पाहत होते. यातच आता तेजश्रीने चाहत्यांना एक बातमी दिली आहे. इन्स्टाग्रामवर एकमेकांना टॅग करुन तेजश्री- सुबोधने त्यांच्या आधीच्या मालिकांची नावं वेगळ्या अंदाजात सांगितली. तेजश्री- सुबोधने गेल्या वर्षी २०२४ मध्ये रिलीज झालेल्या 'हॅशटॅग तदैव लग्नम' सिनेमात काम केलं. यानंतर आता मालिकेत दोघे पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहेत. तेजश्री- सुबोधने काल सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. सुबोध भावेने पोस्टमध्ये, होणार सून 'ती' ह्या घरची तसेच लवकरच हे देखील कॅप्शनमध्ये लिहिलं आहे. ही पोस्ट सुबोध भावेने तेजश्रीला टॅग केले आहे. 'होणार सून मी ह्या घरची' ही तेजश्री प्रधानची गाजलेली मालिका होती. तर तेजश्री प्रधानने सोशल मीडियावर एक पोस्ट करत, तुला पाहते रे तसेच तिने कॅप्शनमध्ये, कोणाला पाहते माहीत आहे का? असे लिहून सुबोध भावेला टॅग केले आहे. या दोन्ही पोस्टवर चाहते आणि कलाकारांकडून कमेंट्सचा वर्षाव होत आहे. 'तुला पाहते रे' ही सुबोध भावेची गाजलेली मालिका होती. सुबोध- तेजश्रीने एकमेकांच्या मालिकांची वेगळ्या अंदाजात नावं घेतली. त्यामुळे त्यांच्या नवीन मालिकेची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. तेजश्री प्रधान आणि सुबोध भावे यांच्या आगामी मालिकेचे नाव अद्याप जाहीर झाले नाही आहे. मात्र अनेक वर्षांनंतर तेजश्री- सुबोधला मालिकेत पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत.



# आमिरने इच्छा नसतानाही 'या' चित्रपटात केले होते काम

प्रसिद्ध अभिनेता आमिर खान सध्या त्याच्या 'सितारे जमीन पर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी त्याने प्रमोशनदरम्यान काही मुलाखती दिल्या. अशातच त्याने दिलेल्या एका मुलाखतीमध्ये त्याला इच्छा नसतानाही एका प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या चित्रपटात काम करावं लागलं होतं याबद्दल सांगितलं आहे. या चित्रपटात अमिताभ बच्चन, कतरिना कैफ हे कलाकारही झळकले होते. 'यशराज फिल्म'सची निर्मिती असलेल्या 'ठग्स ऑफ हिंदोस्तान' या चित्रपटात आमिर खान, अमिताभ बच्चन, कतरिना कैफ, फातिमा सना शेख हे कलाकार झळकले होते. २०१८ साली दिवाळीच्या दरम्यान हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. वृत्तानुसार हा त्या वर्षातील बहुचर्चित चित्रपट होता. ५०.७४ कोटी या चित्रपटाची सुरुवातीच्या दिवसांतील कमाई होती; पण नंतर मात्र या चित्रपटाला फारसा चांगला प्रतिसाद मिळाला नाही. आमिर खानने 'ठग्स ऑफ हिंदोस्तान' या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली होती.

चित्रपटात कलाकारांची तगडी फौज असूनही चित्रपट काही फारसा चालला नाही. चित्रपटाला प्रेक्षकांचा अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आमिर खानला स्वत: या चित्रपटाच्या अपयशाची जबाबदारी घ्यावी लागली होती. 'झी म्युझिक कंपनी'सह संवाद साधताना तो म्हणाला, 'ठग्स ऑफ हिंदोस्तान' हा चित्रपट मला आवडला नव्हता. आता हा चित्रपट प्रदर्शित होऊन बरीच वर्षे झाली आहेत आणि मी आदित्य चोप्राचा खूप आदर करतो; पण काही कारणांमुळे आमच्यात मतभेद होते. जेव्हा चित्रपट तयार झाला होता तेव्हा आदित्य व आमच्या दिग्दर्शकांना तो खूप आवडला होता; पण मला तो जराही आवडला नव्हता. आमिर म्हणाला, प्रेक्षकांनाही चित्रपट आवडणार नाही याची त्याला पूर्वकल्पना होती. याकरिता त्याने चित्रपटाचा निर्माता आदित्य चोप्रा व दिग्दर्शक विजय कृष्ण आचार्य यांना समजावण्याचा प्रयत्नही केला होता. अभिनेता पुढे म्हणाला, संहिता लिहितानाच मला चित्रपट आवडला नव्हता. मी त्याला आठ महिने समजावण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना विश्वास होता की, चित्रपट खूप छान बनेल. मग शेवटी निर्माता आणि दिग्दर्शक यांनी जो निर्णय घेतला, तोच मी मान्य केला. आणि त्यांनी सांगितलं त्याप्रमाणे काम केलं. आमिर खान पुढे म्हणाला, चित्रपट प्रदर्शित होण्याच्या आठवडाभरापूर्वी तो लहान मुलासारखा झोपला होता. जे त्याच्या इतर चित्रपटांच्या प्रदर्शनाच्या वेळी तो कधीच करत नाही. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जवळ आली की, त्याची झोप उडते. आमिर याबाबत म्हणाला, त्यावेळी मला किरण विचारत होती की, तुला झोप कशी येत आहे तेव्हा मी म्हटलं की, मला चित्रपटाची जराही काळजी नाहीये. कारण मला माहीत आहे की, हा चित्रपट चालणारच नाही. मलाच तो आवडला नाही. त्यामुळे मी प्रेक्षकांना आवडेल, अशी अपेक्षा का करू.



लक्ष्मण दिग्दर्शक ओम राऊत यांनी यंदा कान्समध्ये आगामी सिनेमाची घोषणा केली. जनतेचे राष्ट्रपती, 'मिसाईल मॅन' अशी ओळख असलेले डॉ एपीजे अब्दुल कलाम यांचा बायोपिक रुपेरी पडद्यावर येणार आहे. 'कलाम: द मिसाईल मॅन ऑफ इंडिया' असं सिनेमाचं टायटल आहे. ओम राऊत यांनी या सिनेमासाठी साऊथचा सुपरस्टार अभिनेता धनुषची निवड केली आहे. दरम्यान या भूमिकेसाठी धनुषलाच का घेतलं? यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. चित्रपटाविषयी बोलताना राऊत म्हणाले, डॉ. कलाम यांचे विचार प्रत्येक तरुणाच्या मनात खोलवर रुतलेले आहेत. डॉ. कलाम यांचा जीवनप्रवास नेहमीच मला प्रेरणा देत आला आहे. मी जाणलं की त्यांच्या आयुष्याचे तीन प्रमुख आधारस्तंभ होते. त्याच पहिलं शिक्षण. ते एक महान शिक्षक होते आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला ते खूप महत्त्व द्यायचे. दुसरं, नवोन्मेष विशेषतः स्वदेशी नवोन्मेष. त्यांनी नेहमी आपल्या देशातच निर्माण करण्यावर भर दिला. आणि तिसरं, दृढ निश्चय आपल्या ध्येयासाठी अविचल समर्पण. मी नेहमीच असा चित्रपट बनवण्याची धारणा ठेवली होती जो या तीन मूल्यांना प्रभावीपणे दर्शवेल. देवाच्या कृपेने, निर्माते अभिषेक अग्रवाल यांच्याकडून हाच विषय घेऊन प्रस्ताव आला. जेव्हा त्यांनी विचारले की मला स्वारस्य आहे का तेव्हा मी त्यांना सांगितलं की मी आधीच यावर काम करत आहे. ते हैदराबादहून मुंबईत आले. आम्ही सविस्तर चर्चा केली आणि शेवटी टी- सीरीज

# धनुष साकारणार डॉ. कलामांची भूमिका

व भूषण कुमार हेही या प्रकल्पात सहभागी झाले. हे आमचं तिसरं एकत्र काम असून आम्ही पूर्ण ताकदीने पुढे जात आहोत. धनुषला मुख्य भूमिकेसाठी निवडण्यावर राऊत म्हणाले, जेव्हा तुम्ही डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वाला मोठ्या पडद्यावर साकारायचं ठरवता, तेव्हा केवळ त्यांच्या यशाचं नव्हे तर त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाचं आणि शिकवणीचंही प्रतिबिंब पडद्यावर उमटलं पाहिजे. हेच कोणत्याही बायोपिकचं सर्वात कठीण आणि संवेदनशील टप्पा असतो. आणि मला असं वाटतं की धनुषपेक्षा ही खोली आणि भावना नीट साकारणारा दुसरा कोणताही अभिनेता असू शकला नसता. तो या भूमिकेसाठी परिपूर्ण आहे. माझ्या संपूर्ण टीमकडून मी त्याचे मन:पूर्वक आभार मानतो की तो या महत्त्वाच्या प्रकल्पाचा भाग बनला आहे. 'कलाम: द मिसाईल मॅन ऑफ इंडिया'ची साईविन क्वाड्रस यांनी स्क्रिप्ट लिहिली आहे. डॉ. कलाम यांच्या रामेश्वरममध्ये घालवलेल्या बालपणापासून ते राष्ट्रपती भवनातील त्यांच्या कार्यकाळापर्यंतचा प्रवास- एक शास्त्रज्ञ, शिक्षक, दूरदृष्टी असलेले नेतृत्व आणि लोकप्रिय राष्ट्रपती म्हणून झालेली त्यांची घडण हे सर्व या चित्रपटात सखोलपणे मांडले जाणार आहे. मिसाईल मॅन ऑफ इंडिया म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॉ. कलाम यांची प्रेरणादायक वारसा 'विंग्स ऑफ फायर'च्या माध्यमातून आजही पिढ्यानपिढ्या प्रभाव टाकत आहे.



# 'बॉर्डर २' चित्रपटात सोनम बाजवा

जे.पी. दत्ता यांच्या दिग्दर्शनाखाली तयार १९९७ मध्ये प्रदर्शित चित्रपट बॉर्डर या चित्रपटाचा आता सीक्वेल येणार आहे. सनी देओलने बॉर्डर २ या चित्रपटाचे अधिकृत पोस्टर यापूर्वीच शेअर केले आहे. परंतु या नव्या चित्रपटात दिलजीत दोसांझ आणि अहान शेट्टी यांची एंट्री झाली आहे. आता पहिल्या अभिनेत्रीचे नावही निश्चित झाले आहे. सनी देओल-वरुण धवन यांची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटात पंजाबी अभिनेत्री सोनम बाजवाची एंट्री झाली आहे. या चित्रपटाच्या चित्रिकरणात ती चालू महिन्याच्या अखेरीस सामील होणार आहे. ती या चित्रपटात एका पंजाबी युवतीची भूमिका साकारणार आहे.

बॉर्डर २ चित्रपटात तिची जोडी दिलजीत दोसांझसोबत जमणार आहे. यापूर्वी या दोघांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. बॉर्डर २ या चित्रपटात अनेक नवे कलाकार असले तरीही यात जुने गाणे 'संदेसे आते हैं' समाविष्ट असणार आहे. या गाण्याला सोनू निगम आणि अरिजीत सिंह यांचा आवाज यावेळी लाभणार आहे.




# रणदीप हुड्डा झळकणार नवीन चित्रपटात

अभिनेता बॉलीवूड अभिनेता रणदीप हुड्डाने नुकतीच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये अभिनेता एका वेगळ्याच लूकमध्ये पाहायला मिळत आहे. त्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये नवीन चित्रपटाबद्दलच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. रणदीप त्याची प्रत्येक भूमिका चोख पार पाडतो. २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटातील त्याच्या भूमिकेसाठी त्याचं अनेकांकडून कौतुक करण्यात आलं होतं. या चित्रपटासाठी त्यानं स्वत:वर खूप मेहनत घेतली होती. तो त्याच्या प्रत्येक भूमिकेसाठी खास मेहनत घेत असतो. रणदीपने शेअर केलेली ही पोस्ट त्याच्या नवीन चित्रपटातील भूमिकेसंबंधित आहे का, असा प्रश्न त्याच्या चाहत्यांना पडला आहे. या पोस्टला अभिनेत्याने दिलेल्या कॅप्शनने लक्ष वेधले आहे. तर त्याने नुकत्याच शेअर केलेल्या या पोस्टमध्ये त्याचा वेगळाच लूक पाहायला मिळतोय. त्याने त्याचे अर्धे टक्कल असलेला फोटो शेअर केला आहे. त्यासह त्याच्या चेहऱ्यामध्येही थोडा बदल जाणवत आहे. त्यामुळे हा लूक त्याच्या नवीन चित्रपटातील भूमिकेसाठी आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. रणदीपने इन्स्टाग्रामवर पोस्ट केलेल्या या फोटोखाली प्रेक्षकांनी कमेंट्स केल्याचे पाहायला मिळते. एका नेटकऱ्याने या पोस्टखाली हा लूक नवीन बायोपिकसाठी आहे का असे म्हटले आहे. दुसऱ्याने, नवीन प्रोजेक्ट, अशी कमेंट केली आहे. काहींनी तो सुभाषचंद्र बोस यांचा चरित्रपट बनवणार आहे का अशा कमेंट्सही केल्या आहेत. एकूणच त्याचे चाहते या लूकमागचे कारण जाणून घेण्यासाठी उत्सूक असल्याचे पाहायला मिळत आहे. रणदीप हुड्डाने २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर या चित्रपटासाठी स्वत:मध्ये अनेक बदल केल्याचे सांगितले होते. या चित्रपटासाठी त्याने २८ दिवसांत १८ किलो वजन कमी केल्याचे सांगितले होते. या भूमिकेसाठी त्याने त्याच्या आहारातही लक्षणीय बदल केले होते. त्याबाबत त्याने मागे एका मुलाखतीमध्ये माहिती दिली होती. रणदीप प्रत्येक भूमिकेला त्याचे १०० टक्के देण्याचा प्रयत्न करतो आणि कामाप्रति असलेली त्याची शिस्त यांसारख्या गोष्टींमुळेच तो प्रत्येक भूमिका चोख पार पाडतो. यासाठी त्याचे चाहते त्याचे कौतुकही करीत असतात. दरम्यान, रणदीपच्या कामाबद्दल बोलायचे झाले, तर तो नुकताच 'जाट' चित्रपटातून झळकला होता. त्यामध्ये त्याच्यासह प्रसिद्ध अभिनेता सनी देओलही महत्त्वपूर्ण भूमिकेत पाहायला मिळाला. त्यांच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.

# थ्रिलरपटात दिसून येणार शनाया

बॉलिवूडला आता एक नवी जोडी पहायला मिळणार आहे. आदर्श गौरव आणि शनाया कपूर यांनी 'तू या मैं' या चित्रपटाचे चित्रिकरण सुरू केले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन बिजॉय नांबियार करत आहे. आदर्श गौरव अणि शनायाच्या या चित्रपटाचा टीजर यापूर्वी प्रदर्शित झाला असून यामुळे चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. आदर्श हा 'द व्हाइट टायगर', 'खो गए हम कहां' यासारख्या चित्रपटांसाठी ओळखला जातो. तर 'तू या मैं' या चित्रपटात तो एका छोट्या शहरातील सोशल मीडिया इन्फ्लुएंसरची भूमिका साकारणाऱ्या आहे. या चित्रपटात काम करण्यासाठी अत्यंत उत्सुक आहे. याचे चित्रिकरण सुरू झाले आहे. माझ्या मागील भूमिकांपेक्षा ही भूमिका अत्यंत वेगळी आहे, याचमुळे या कथेबाबत माझे आकर्षण वाढले आहे. बिजॉय नांबियारसारखा अनोखा दिग्दर्शक आणि शनायासोबत काम करता येणार असल्याने हा अनुभव मजेशीर ठरेल असे आदर्शने म्हटले. 'तू या मैं' हा सायकोलॉजिकल सर्वाइवल थ्रिलर चित्रपट असून तो रोमान्ससोबत भय अन् जीवनातील संघर्ष नव्या पद्धतीने दाखविणारा आहे. या चित्रपटाची निर्मिती आनंद एल. राय यांची प्रॉडक्शन कंपनी कलर येलो प्रॉडक्शन्सकडून केली जात आहे. हा चित्रपट १४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.





# गांगुलीच्या बायोपिकमध्ये राजकुमार राव

भारताचा भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांची 'दादा' म्हणून ओळख आहे. मागील काही दिवसांपासून त्याच्या बायोपिकची चर्चा सुरू आहे. आता या चित्रपटाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. यात सौरव गांगुलीची भूमिका राजकुमार राव साकारणार असल्याचे निश्चित झाले आहे. एका मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, मी ही बायोपिक करत आहे. मी लहानपणापासून क्रिकेट खेळत आलोय. खूप मजा येणार आहे. नक्कीच ही आव्हानात्मक भूमिका असणार आहे. त्यामुळे मी थोडा नर्व्हस आहे. पण त्यापेक्षा जास्त उत्साहित आहे. यावेळी राजकुमार राव यांनी चित्रपटासाठी बंगाली शिकण्यात आलेल्या अडचणींचाही उल्लेख केला. मात्र, त्याच्यासाठी हे फारसे अवघड नव्हते, कारण त्यांची पत्नी पत्रलेखा ही देखील बंगाली आहे. त्यामुळे ते आपल्या पत्नीकडून बंगाली शिकतात. तरीही, या भूमिकेसाठी स्वत:ला तयार करणे राजकुमारसाठी आव्हानात्मक होते. यापूर्वी सौरव गांगुलीने स्वतः त्यांच्या बायोपिकबाबत बोलताना सांगितले होते की. राजकुमार राव त्यांची भूमिका साकारणार आहेत. मात्र, त्यानंतर तारखांच्या अडचणींमुळे काही अटकळीही बांधल्या गेल्या होत्या. आता राजकुमार राव यांनी चित्रपटाची पुष्टी करत आपली भूमिका निश्चित केली आहे. या बायोपिकमध्ये सौरव गांगुली यांच्या वैयक्तिक आयुष्यापासून ते त्यांच्या कारकिर्दीपर्यंतच्या गोष्टी दाखवल्या जाणार आहेत. राजकुमार राव यांच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले, तर तो ॲक्शन-थ्रिलर चित्रपट 'मालिक'मुळे चर्चेत आहेत. हा चित्रपट ११ जुलै रोजी चित्रपटगृहांमध्ये रिलीज होणार आहे. या चित्रपटात राजकुमार राव यांच्यासोबत मानुषी छिल्लर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. राजकुमार रावने याआधी श्रीकांत, शाहिद, अलीगढ, ओमेर्ता और चिट्टगोंग, बोस यासारखे बायोपिक देखील केले आहे. आता गांगुलीच्या क्रिकेट करिअरमधील अनेक ऐतिहासिक क्षण पडद्यावर पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमी उत्सुक आहेत.



**'चंदा रे! जा रे! जा रे! पिया से संदेशा मोरा कहीयो जा।' लता मंगेशकर यांच्या सुरुवातीच्या काळातील जादुई स्वरातील गाणे १९४८ सालच्या बॉम्बे टॉकीजच्या 'जिद्दी' सिनेमातले हे सुमधुर गाणे कामिनी कौशलवर चित्रित झाले. संथ स्वरात सुरू झालेले आतुरता प्रकट करणारे हे गाणे लगेच दृतात प्रवेश करते. चंद्राला उद्देशून म्हटलेल्या या गाण्यात कामिनी यांनी चेहऱ्यावर मिलनाची आतुरता स्पष्ट अभिनित केली.**

# महानायिका : कामिनी कौशल



'जादू कर गये किसी के नैना। मन मोरा बस मे नही।। याच चित्रपटातील या गाण्यात देवानंद या नायकाच्या स्मृतीत मनाची अविचल अवस्था व्यक्त करून उत्कृष्ट अभिनय केला. कामिनी कौशल हे केवळ एका अभिनेत्रीचे नाव नसून ती एक उपाधी आहे. पुढील काळात कमाल अमरोहींसारख्या दिग्गज कलाकाराने इंदुमती पैंगणकर या कलाश्रेष्ठीला तिच्यातील कलेसाठी 'कानन कौशल' हे नाव दिले. त्यातील 'कानन' हे ४० च्या दशकातील 'काननबाला'च्या नावावरून व 'कौशल' हे ५० च्या दशकातील 'कामिनी कौशलवरून. हे आहे कामिनी यांचे श्रेष्ठत्व! 'कैसे कोई आग लगी है। हम रुकेंगे भी नही।।' चित्रपटात येण्यापूर्वी लाहोर रेडिओवर नाट्याचे प्रयोग सादर करणाऱ्या उमा कश्यप (कामिनी कौशल) यांची कला तत्कालीन निर्माता निर्देशक 'चेतन आनंद यांच्या नजरेत भरली. तिच्यातील अभिनय क्षमता ओळखून तिला १९४६ सालच्या 'नीचानगर' चित्रपटात मुख्य भूमिका दिली. उमा कश्यप हे त्यांचे नाव बदलवून 'कामिनी कौशल' ठेवले.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीवर टीका करण्यास कथानकाचा वापर खुबीने केला. ब्रिटिश सेन्सरपासून बचावासाठी अशी कथानके उपयोगी ठरत. 'मेरा सुंदर सपना बित गया' १९४७ सालच्या 'दो भाई' चित्रपटात गीता दत्त यांच्या गाण्यावर अभिनय केला. पदार्पणातच कामिनी कौशल यांच्या अभिनयाचा प्रभाव पाहून त्या काळातील महान निर्माते, निर्देशक व अभिनेते गजानन जहागीरदार यांनी राज कपूरसोबत त्यांना घेऊन 'जेलयात्रा' चित्रपट १९४७ साली काढला. राज कपूर यांनीही तिला त्यांच्या स्वतःच्या निर्मितीत तयार झालेल्या 'आग' चित्रपटात कास्ट केले. त्यात 'निर्मला' नावाचे पात्र कामिनी यांनी सजीव केले. कामिनी यांनी नंतर मागे वळून पाहिले नाही.

ललिता देऊळकर व मोहम्मद रफींनी १९४८ साली 'नदिया के पार' चित्रपटासाठी हे गायले होते, जे त्या काळी खूप गाजले होते. १९४८ साली या चित्रपटाने सर्वाधिक कमाई केली होती. १९४९ साली 'फिल्मीस्तान'च्या बॅनरखाली या जोडीचा 'शबनम' चित्रपट बॉक्स ऑफिसवर हीट झाला. या चित्रपटाने या जोडीच्या अभिनव अभिनयाने प्रचंड यश मिळवून दिले. शहीद लतीफ यांनी १९५० साली दिलीप व कामिनी यांना घेऊन 'आरजू' चित्रपटाची निर्मिती केली. अनिल विश्वास यांच्या संगीताने व या दोघांच्या भावपूर्ण अभिनयाने या चित्रपटाला उंचीवर नेवून ठेवले. १९४८ ते १९५० पर्यंत सलग चार चित्रपट या जोडीचे एकत्र आले. भरपूर यश व पैसा मिळवून दिल्यामुळे ही जोडी चित्रपट यशस्वी होण्याची गुरुकिल्ली ठरली. या आधी असे झाले नव्हते. अशा प्रकारे चित्रपटातील यशस्वी जीवन जगण्याच्या आधीच कामिनी कौशल यांच्या वैयक्तिक जीवनाने वेगळेच वळण घेतले होते.

कामिनी कौशल यांचा जन्म १६ जानेवारी १९२७ रोजी लाहोर येथे एका अत्यंत सुविद्य व सुसंस्कृत कुटुंबात झाला होता. त्यांचे नाव उमा कश्यप होते. वडील शिवराम कश्यप पंजाब विद्यापीठात बॉटनीचे प्राध्यापक होते. त्या स्वतः लाहोर येथे शिकून इंग्लिश लिटरेचर घेऊन बी.ए. ऑनर्स झाल्या होत्या. त्यांच्या वडील बहिणीचा विवाह मुंबई येथील पोर्ट ट्रस्ट ऑफ इंडियात चीफ इंजिनीअर असलेले बी. एस. सूद यांच्याशी झाला होता. बहिणीला दोन कन्या होत्या. परंतु एका कार अपघातात कामिनी यांच्या बहिणीचे निधन झाले. घरच्या लोकांच्या आग्रहामुळे त्यांना सूद यांच्याशी विवाह करावा लागला. ते वर्ष होते १९४७. 'नीचानगर' चित्रपटानंतर त्या लाहोरला गेल्या होत्या; दरम्यान हे सर्व घडले. सूद व त्यांच्या दोन्ही कन्यांना घेऊन त्या विवाहानंतर मुंबईत आल्या व चित्रपटात कामे करू लागल्या. वरील विवाह त्यांनी कुटुंबाच्या आज्ञेने व कर्तव्य समजून केले. तरीही 'शहीद' चित्रपटादरम्यान दिलीपकुमार व कामिनी कौशल प्रेमात पडलेत. त्यांनी विवाहाचा विचारही केला होता. पुन्हा कर्तव्याने प्रेमावर विजय मिळविला. सूद यांच्यापासून त्यांना तीन मुले झालीत. बहिणीच्या दोन मुलींचाही सांभाळ त्यांनीच केला. ऐन तारुण्यात फुटलेला प्रेमाचा अंकुर कर्तव्यापुढे करपू दिला व चंदेरी दुनियेतील झगमगाटातील उर्वरित आयुष्य कर्तव्याने बांधलेल्या नात्यांसह जगल्या, नव्हे आजही जगत आहेत.

अशोककुमार हे त्यांचे बालपणापासूनच आवडते कलाकार होते. त्यांनी त्यांच्यासोबत दोन चित्रपटात नायिका साकारली. 'दिन सुहाने ये मोसम बहार का' लताबाईंच्या स्वराने हृदयात गोड शिरशिरी यावी असे हे मधूर गीत १९५२ च्या 'पूनम' चित्रपटात आहे. प्रेमाच्या संभाव्य साफल्याच्या आनंदात हे पडद्यावर अभिनित केले आहे. १९५४ साली आलेल्या दिग्गज बिमल रॉय यांच्या दिग्दर्शनात 'बिराज बहू' चित्रपटात कामिनी कौशल यांनी त्यागमय स्त्रीच्या अभिनयाचा कस लावला व सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा 'फिल्म फेअर' अवॉर्ड मिळविला. १९६३ सालच्या 'गोदान' चित्रपटाला आपल्या सज्जड अभिनयाने यश मिळवून दिल्यावर त्या चरित्र भूमिकेकडे वळल्या. १९६४ साली 'शहीद' चित्रपटात मनोज कुमारची आई झाल्या व नंतर मनोजकुमारला आठ तर राजेश खन्नाला चार चित्रपटात आईच्या भूमिकेत ममत्व दिले. त्यांनी एकंदर ९५ चित्रपटात भूमिका केल्यात. त्यांच्या दिलखुलास व्यक्तिमत्त्वामुळे व पडद्यामागील विनोदी कलागतीमुळे राज कपूर त्यांना गमतीने 'देशी खर्रा' म्हणायचे. त्यांच्या विशाल चित्रपट कारकीर्दीत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. कामिनी कौशल यांनी वयाची ९८ वर्षे पार पाडली आहेत. त्यांच्या हयातील त्यांना मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळावा, हीच चित्रपट रसिकाची इच्छा आहे.

**रमेश पोफळी**

# कोरिओग्राफर गीता कपूरने सोडलं बॉलीवूड



लक्ष्मण प्रसिद्ध कोरिओग्राफर गीता कपूरने बॉलीवूड सोडलं आहे. तिने स्वतः एका मुलाखतीत यामागचं कारण सांगितलं आहे. असिस्टंट कोरिओग्राफर म्हणून गीताने तिच्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. ती 'कुछ कुछ होता है' आणि 'दिल तो पागल है' सारख्या गाण्यासाठी फराह खानला असिस्टंट होती. मागील अनेक वर्षांपासून ती टीव्हीवरील डान्स रिॲलिटी शोज जज करतेय. बॉलीवूडमध्ये परतण्याचा कोणताही विचार नसल्याचं गीता कपूरने स्पष्ट केलं आहे. एका मुलाखतीत गीता कपूरला विचारण्यात आलं की तू बॉलीवूडमध्ये पुनरागमन कधी करणार आहेस? बराच काळ झाला आहे, तू पुरेसा ब्रेक घेतलाय. त्यावर गीता म्हणाली, नाही.

मला वाटतं की प्रत्येक व्यक्तीने एक पाऊल मागे जायला पाहिजे आणि नवीन प्रतिभावान लोकांना पुढे जाण्यासाठी संधी दिली पाहिजे. गीता पुढे म्हणाली, आता इतरांनी पुढे जायची वेळ आली आहे. या इंडस्ट्रीने आपल्याला जे काही दिलं आणि काम, पैसा आणि प्रसिद्धीच्या बाबतीत जे काही आशीर्वाद दिले, ते मला मिळाले असं मला वाटते. पण आता जेव्हा एखादी संधी अशी येईल जी मला सोडावी वाटणार नाही, तेव्हाच कदाचित मी परतेन, नाहीतर परतणार नाही. गीता कपूर म्हणाली, सध्या इंडस्ट्रीमध्ये कामाची कमतरता आहे. त्यामुळे इतर लोकांना संधी दिली पाहिजे. आजकाल असे चित्रपट बनत नाहीत, जसे आमच्या काळात बनवले जायचे, त्यात ८-१० गाणी असायची. मोठी गाणी असायची. डान्सवर आधारित गाणी असायची. त्यामुळे आधीच काम कमी असताना तेही आम्ही हिसकावून घेणं आणि इतरांना संधी न देणं चुकीचं ठरेल. त्यामुळे त्या लोकांनी काम करावं. मी जिथे आहे तिथे मी आनंदी आहे.

गीता कपूर म्हणाली की तिला कोणत्याही बंधनात काम करायचे नाही. तिला कॉपी-पेस्ट काम करायचं, क्रिएटिव्ह काम करायचंय. गीताने वयाच्या १७ व्या वर्षी डान्सिंग करिअरला सुरुवात केली होती. त्यानंतर ती फराह खानच्या ग्रुपमध्ये सामील झाली होती. तिने फराहला 'कुछ कुछ होता है' आणि 'दिल तो पागल है' 'कभी खुशी कभी गम', 'मोहब्बतें', 'कल हो ना हो', 'मैं हूं ना' आणि 'ओम शांती ओम'सह अनेक चित्रपटांमध्ये असिस्ट केले. गीता कपूरने फराहला तिच्या आईचा दर्जा दिला आहे आणि तिला आपला गुरूही मानते.

# 'सन ऑफ सरदार २'मध्ये दिसणार मृणाल ठाकूर



'रेड २' च्या यशानंतर अजय देवगण लवकरच बॉक्स ऑफिसवर आणखी एक सीक्वल घेऊन येत आहे. सलग दोन धमाकेदार ॲक्शन आणि ड्रामानंतर, अभिनेता 'सन ऑफ सरदार २' द्वारे प्रेक्षकांना कॉमेडीचा एक डोस देण्यासाठी सज्ज झाला आहे. हा आगामी ॲक्शन कॉमेडी 'सन ऑफ सरदार' (२०१२) चा सीक्वल आहे आणि हा चित्रपट या वर्षी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. 'सन ऑफ सरदार २' हा चित्रपट देखील खास आहे कारण हा दिवंगत अभिनेता मुकुल देवचा शेवटचा चित्रपट आहे. मुकुल देवचे २३ मे २०२५ रोजी निधन झाले. चित्रपटाच्या इतर कलाकारांमध्ये विंदू दारा सिंह, रवी किशन आणि शरत सक्सेना यांचा समावेश आहे. 'सन ऑफ सरदार २'मध्ये मृणाल ठाकूर देखील मुख्य भूमिकेत आहेत. पण चित्रपटात अजय देवगणच्या पत्नीची भूमिका एक पंजाबी अभिनेत्री साकारणार आहे. सन ऑफ सरदार २ मध्ये मृणाल ठाकूर मुख्य भूमिकेत आहे. मात्र प्रोजेक्टशी संबंधित एका जवळच्या सूत्राने डीएनएकडे खुलासा केला आहे की मृणाल ही चित्रपटातील एकमेव मुख्य अभिनेत्री नाही. वृत्तानुसार, पंजाबी स्टार अभिनेत्री नीरू बाजवा या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. एका सूत्राने खुलासा केला आहे की नीरू अजय देवगणच्या पत्नीची भूमिका साकारणार आहे. नीरू ही पंजाबी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. तिने टॉप प्रोडक्शन हाऊस आणि मोठ्या स्टार्ससोबत काम केले आहे आणि जट्ट अँड ज्युलिएट फ्रँचायझी आणि सरदारजी फ्रँचायझीसह अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. नीरूने बॉलिवूडमध्येही नशीब आजमावले आणि प्रिन्सः इट्स शोटाइममध्ये विवेक ओबेरॉयसोबत सुरूवात केली होती. मात्र प्रिन्ससोबतची तिची कारकीर्द फारशी यशस्वी ठरली नाही. ॲक्शन कॉमेडी सन ऑफ सरदार २ हा अजय देवगणचा २०२५ मधील दुसरा चित्रपट आहे जो त्याच्या रेड २ या हिट चित्रपटानंतर प्रदर्शित झाला आहे. सन ऑफ सरदार पार्ट वन १२ नोव्हेंबर २०१२ रोजी प्रदर्शित झाला होता. सन ऑफ सरदारची टक्कर शाहरुख खानच्या जब तक है जानशी झाली होती. सन ऑफ सरदार २ हा चित्रपट २५ जुलै रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. भेटीला पुन्हा एकदा येणार, अशी माहिती दिली आहे. यामध्ये माधुरी दीक्षित, शाहरुख खान, करिश्मा कपूर, अक्षय कुमार यांच्या भूमिका होत्या. नेटकऱ्यांनी या पोस्टवर कमेंट करत सिनेमा पाहण्यासाठी आतुर असल्याचं म्हटलं आहे.




# 'पंचायत ४' येणार लवकरच भेटीला

वेबसीरिज 'पंचायत'चे मागील तीन सीझन सुपरहिट ठरले होते. प्रेम, मैत्री आणि राजकारणाने पुरेपूर या सीरिजच्या कहाणीने सर्वांना वेड लावले होते. आता याच्या चौथ्या सीझनची प्रतीक्षा लोक करत आहेत. नीना गुप्ता, रघुवीर यादव, फैसल मलिक, चंदन रॉय, जितेंद्र कुमार, संविका, दुर्गेश, सुनीता राजवर आणि पंकज झा हे कलाकार असलेल्या 'पंचायत ४'ची प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. पंचायत ही सीरिज द वायरल फीलर म्हणजेच टीव्हीएफने निर्माण केली आहे. दीपक कुमार मिश्रा आणि अक्षय विजयवर्गीय याचे दिग्दर्शन असून चंदन कुमार लेखक अन् निर्माता आहे. पंचायत सीरिजच्या तिसऱ्या सीझनच्या अखेरीस प्रधानजीवर गोळी झाडल्याने ते जखमी झाले होते. फुलेरामध्ये निवडणुकीच्या वातावरणादरम्यान सर्वत्र टेन्शन दिसून आले होते. पंचायत सीझन ४ चा ट्रेलर अद्याप जारी करण्यात आलेला नाही. परंतु टीझर सादर करण्यात आला आहे. या सीझनचे सर्व एपिसोड २ जुलैपासून प्राइम व्हिडिओवर पाहता येणार आहेत. या सीरिजमध्ये निवडणुकीचे वातावरण दिसून येणार आहे.

# मीना कुमारींच्या बायोपिकसाठी कियाराला ऑफर



मीना कुमारी ह्या हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानल्या जातात. त्यांना 'ट्रॅजेडी क्वीन' म्हणून ओळखले जायचे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत बहुतांश दुःखद आणि भावनिक भूमिका साकारल्या. 'बैजू बावरा', 'परिणीता', 'साहिब बीवी और गुलाम', 'काजल' आणि 'पाकीजा' यांसारखे त्यांचे चित्रपट आजही लोकांच्या मनात घर करून आहेत.

मीना कुमारी यांनी चार वेळा फिल्मफेअर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जिंकला होता. वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी जगाचा निरोप घेणाऱ्या मीना कुमारी यांच्यावर लवकरच एक बायोपिक येणार आहे. रिपोर्टनुसार, कियारा अडवाणी ला मीनाकुमारीच्या भूमिकेसाठी विचारणा झाली आहे. काही दिवसांपूर्वी तिला स्क्रीप्टही ऐकवण्यात आली.

तिने स्क्रीप्टला पसंतीही दर्शवली आहे. मात्र अद्याप तिने सिनेमा साईन केलेला नाही. सिनेमाच्या टीमनुसार कियाराच या भूमिकेसाठी योग्य आहे. या भूमिकेसाठी आधी अभिनेत्री क्रिती सेननचाही विचार करण्यात आला होता. मात्र आता या सिनेमासाठी कियाराला ऑफर मिळाली आहे. दरम्यान, कियारा अडवाणी लवकरच आई होणार आहे. काही महिन्यांपूर्वीच कियाराने कान्समध्ये पदार्पण केले होते. रेड कार्पेटवर तिने आपल्या फॅशनचा जलवा दाखवला होता. यावेळी टू बी मॉम कियाराचा बेबी बंप स्पष्ट दिसत होता. कियारा आगामी 'वॉर २' सिनेमात दिसणार आहे.